ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ पुणें, बुधवार तारीख ४ ऑक्टोबर, १९६१ अंक १९

## विविध माहिती

**गिरणी कामगारांना बोनस**—अहमदाबाद गिरणी मालक-संघ आणि इंडिअन नॅशनल ट्रेड युनिअन काँग्रेस ह्यांच्या दरम्यान १९५९–६० सालासाठीं कामगारांना द्यावयाच्या बोनसबद्दल वाटाघाटी चालू आहेत. वाटाघाटींत यश येण्याचा बराच संभव आहे. त्या यशस्वी झाल्या तर शहरांतील ६४ गिरण्यांमधील १ लाख कामगारांना त्याचा फायदा मिळेल.

**आरोग्य योजनांना मदत**—जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिआ विभाग समितीची १४ वी बैठक उटकमंड येथें भरली होती. बैठकींत कलकत्ता शहराच्या पाणीपुरवठ्याच्या व ड्रेनेजच्या योजनेला मदत करण्याचें ठरलें. त्याशिवाय नागपूर येथील सार्वजनिक आरोग्य संशोधन संस्थेलाहि मदत देण्याचें ठरलें. ह्या दोन्हीं कामांसाठीं सुमारें १० लाख डॉलर्स अथवा ४७ लाख रुपये लागतील.

**एंजिनिअरिंगचें वाढतें शिक्षण**—भारत सरकारचे शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री श्री. हमायून कबीर ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, देशांतील एंजिनिअरिंग कॉलेजमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जागा ६,००० पासून १३,००० पर्यंत वाढविण्यांत आल्या आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस २०,००० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येईल.

**बिहारमधील विद्युत्‌केंद्र**—बिहारमधील हजारीबाग जिल्ह्यांत राज्य सरकार रशिअन तज्ज्ञांच्या मदतीनें एक विद्युत्‌केंद्र उभारीत आहे. ह्या केंद्रासाठीं ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. उभारणीचें काम १९६४ मध्यें पुरें होऊन १०० मेगॅवॅट विजेचें उत्पादन होऊं लागेल. १९६६ मध्यें केंद्राची उत्पादनशक्ति आणखीं जास्त होईल. त्या वेळीं ३५० मेगॅवॅट वीज उत्पादन होऊं लागेल.

**मॉस्को विद्यापीठांत हिंदी विद्यार्थी**—अविकसित देशांतील होतकरू तरुणांना उच्च शिक्षणाचा लाभ देतां यावा म्हणून मॉस्को येथें लुमुंबा विद्यापीठ स्थापन करण्यांत आलें आहे. ह्या विद्यापीठांत सध्या २० हिंदी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यांत येत आहे. पुढील वर्षीं हिंदी विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यांत येणार असून ३० ते ४० विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळेल.

**पाण्याचें बाष्पीभवन टाळण्याचा उपाय**—कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेनें तलावांतील व तळ्याविहिरींतील पाण्याचें बाष्पीभवन टाळण्याचा उपाय शोधून काढला आहे. पाण्याच्या मोठाल्या सांठ्यांत एक विशिष्ट रसायन टाकल्यावर तें पाण्यांत मिसळून त्याचा एक थर पाण्याच्या पृष्ठ-भागावर पसरतो. त्यामुळें पाण्याची वाफ होऊन हवेंत शिरण्याची प्रक्रिया बरीच मंदावते.

**सिमेंटची किंमत फारशी वाढणार नाहीं?**—टॅरीफ कमिशननें सिमेंटच्या दर टनाची किंमत १० रुपयांनीं वाढवून देण्याची शिफारस केल्याची वार्ता आहे. तथापि, सरकार किंमतींत इतकी वाढ करणार नाहीं अशी अपेक्षा आहे. सिमेंटची किंमत वाढवून दिल्यास तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील विकासाच्या कामांचा खर्च प्रमाणाबाहेर वाढण्याचा संभव आहे. किंमत वाढली तर शहरांतील घरबांधणीवरहि परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं.

**विजेचें पहिलें रेल्वे-एंजिन**—भारतांत तयार करण्यांत आलेल्या विजेच्या पहिल्या रेल्वे-एंजिनाचा उपयोग पंतप्रधान नेहरू ह्यांच्या हस्तें लवकरच सुरू होईल. एंजिनांतील यांत्रिक भाग चित्तरंजन येथील कारखान्यांत तयार होऊं शकतात. पण विजेचे कांहीं भाग मात्र आयात करण्यांत येतील. भोपाळ येथील कारखाना सुरू झाल्यावर विजेचे भागहि देशींच वापरले जातील.

**नवीन जातीच्या कापसाची लागवड**—डहाणूपासून ५ मैलांवर असलेल्या कोसबाड येथें गोखले एज्युकेशन सोसायटीनें एक शेतकी शाळा चालविलेली आहे. शाळेच्या चालकांनीं पावसाळ्यांत सुद्धां पिकणाऱ्या लांब धाग्याच्या कापसाची लागवड यशस्वी रीतीनें करून दाखविली आहे. हा प्रयोग वरकस जमिनींत करण्यांत आला. भाताच्या जमिनींत भात कापल्यानंतर कापूस पिकविण्यांतहि शाळेला यश मिळालें आहे.

**भारी उद्योगधंद्यांची स्थापना**—वर्धा येथें लोखंड व पोलादाच्या भारी वस्तु तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्या प्राथमिक कामास प्रारंभ झाला आहे. ह्या कारखान्यासाठीं २५ ते ३० कोटी रुपये खर्च येणार आहे. महाराष्ट्र राज्यांतील विदर्भांत काढण्यांत येणारा हा पहिला भारी उद्योगधंद्याचा कारखाना आहे.

**शास्त्रीय वाङ्मयाला उत्तेजन**—लोकांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून भारत सरकारनें सोप्या भाषेंत लिहिलेल्या शास्त्रीय वाङ्मयाला उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. शास्त्रीय विषयावर लिहिलेल्या स्वस्त व सुलभ पुस्तकांच्या प्रकाशनाला आर्थिक मदत देण्याचा सरकारचा विचार आहे. अशा पुस्तकांची प्रादेशिक भाषांत भाषांतरेंहि प्रसिद्ध करण्यांत येतील.

• **खताचा सहकारी कारखाना**—मद्रासांतील कोइमतूर-पासून ६० मैलांवर मद्रासी शेतकऱ्यांनीं खताचा एक कारखाना काढण्याची तयारी चालविली आहे. कारखान्यांत दरसाल ३६,००० टन खत तयार करण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीच्या कामांत भारत तांत्रिक साह्य देणार आहे.

**किरणोत्सरणाचा उंदरावर परिणाम**—अणुविच्छेदनामुळें प्रसृत होणाऱ्या किरणांचा उंदरावर काय परिणाम होतो त्याचा अभ्यास करण्यासाठी उस्मानिया विद्यापीठांत प्रयोग करण्यांत येत आहे. किरणोत्सारी द्रव्यें अंगांत असलेले कांहीं उंदीर दरमहा ब्रिटनहून विद्यापीठाला पाठविण्यांत येत असतात. माणसावर किरणोत्सारी द्रव्याचा काय परिणाम होईल तें अजमावयासाठी हे प्रयोग करण्यांत येत आहेत.

**विक्रीकर न घेण्याच्या सूचना**—जागतिक आरोग्य-संघटनेच्या आग्नेय आशिया विभागीय समितीची बैठक उटकमंड येथें भरली होती. बैठकीला आलेल्या प्रतिनिधींनीं अगर निरीक्षकांनीं उटकमंड येथें खरेदी केलेल्या वस्तूंवर व्यापाऱ्यांनीं विक्रीकर घेऊं नये अशा सूचना मुद्दाम देण्यांत आल्या होत्या.

**सायकलींच्या सुट्या भागांचें उत्पादन**—सायकलींच्या सुट्या भागांचें उत्पादन करणाऱ्या एका खाजगी मालकीच्या कारखान्याला भारत सरकारनें परवाना दिला आहे. कारखाना पाँडीचरी येथें स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्या स्थापनेसाठी १० लाख रुपये भांडवल लागणार आहे. पश्चिम जर्मनीहून यंत्रसामग्री मागविण्यांत आली आहे. सुरुवातीला रोज ५०० साखळ्यांचें उत्पादन करण्यांत येईल.

**उसाच्या लागवडीच्या क्षेत्रावर मर्यादा**—पुसा येथील ऊस-संशोधन संस्था, बिहार राज्य सरकारला उसाच्या लागवडीच्या क्षेत्रावर मर्यादा घालण्याची शिफारस करणार आहे. उसाचें उत्पादन बेसुमार होऊं नये म्हणून ही शिफारस करण्यांत येणार आहे. बिहारमधील उसाची शेती १९५०-५१ मध्ये ३४·७ लाख एकरांत होती. आतां उसाखालील जमीन ४० लाख एकरावर वाढली आहे.

**सीलोनचें व्यापारी शिष्टमंडळ**—सीलोन व भारत ह्यांच्यामधील व्यापाराची वृद्धि करण्याची शक्यता अजमावण्यासाठी सीलोनचें व्यापारी शिष्टमंडळ लवकरच भारतांत येणार आहे. उभयता देशांतील व्यापारांत सीलोनच्या बाजूनें प्रतिकूल तफावत आहे. भारत सीलोनशीं दरसाल २५ कोटीचा व्यापार करतो. उलट, सीलोन फक्त ४ कोटीचा व्यापार करतो.

**स्त्री-पुरुषांच्या संख्येंत असमानता**—१९०१ ते १९६१ च्या कालांतील भारताच्या लोकसंख्येंतील स्त्री-पुरुषांच्या प्रमाणाचा अभ्यास करण्यांत आला आहे. त्यावरून असें आढळून आलें आहे की, देशांतील पुरुषांच्या संख्येपेक्षा स्त्रियांची संख्या कमी होत चालली आहे. लोकसंख्येच्या विविध अंगांचें निरीक्षण करणाऱ्या समाजशास्त्रज्ञांना ह्या अभ्यासाचा विशेष फायदा होईल.

**गिरनारच्या जंगलांतील सिंह**—पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारनें गिरनारच्या जंगलांतील सिंहाची शिरगणती १९५० व १९५५ ह्या दोन सालीं केली होती. त्यावरून असें दिसून आलें कीं त्यांची संख्या वाढत आहे. १९५० सालीं जंगलांत २१९ सिंह होते. १९५५ सालीं त्यांची संख्या २९० झाली. गुजरात सरकार आतां सिंहाची आणखी एक शिरगणती करणार आहे.

**पिंपरी येथील कारखान्याचा विस्तार**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत पिंपरी येथील अँटिबायोटिक्सच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ३७० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी २७० लाख रुपये स्ट्रेप्टोमायसिन ह्या औषधाची यंत्रसामग्री बसविण्यासाठी लागतील. कारखान्याजवळ ३४० लाख रुपये शिल्लक आहेत.

**जोडधंद्यांबाबत पहाणी**—मद्रास, महाराष्ट्र आणि बिहार ह्या राज्यांतून मोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करणारे कारखाने काढण्यासंबंधीं एक पहाणी करण्यांत येत आहे. ही पहाणी भारत सरकारनें पुरस्कृत केली असून निरनिराळ्या १५ उद्योग-गटांपुरतीच ती मर्यादित आहे. ह्या गटांत यंत्रसामग्री, यांत्रिक हत्यारें, गणित व शास्त्रविषयक उपकरणें, घरकामासाठी लागणारीं साधनें, इत्यादींचा समावेश आहे.

**ट्रॉम्बे येथील खताचा कारखाना**—मुंबईजवळ ट्रॉम्बे येथें काढण्यांत यावयाच्या खताच्या कारखान्यासंबंधींच्या प्राथमिक तयारींत बरीच प्रगति झाली आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील हा तिसरा मोठा खताचा कारखाना आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी २५ कोटी रुपये लागणार आहेत आणि तो १९६४ च्या प्रारंभी उत्पादनास प्रारंभ करील.

**बेल्जममधील गांधीकेंद्र**:—कवितेचें नोबेल पारितोषिक मिळविणारे फादर पिरे ह्यांनीं बेल्जममध्यें एका गांधीकेंद्राची स्थापना केली आहे. ह्या केंद्रांत शांततेसाठीं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यांत येतें. कार्यकर्त्यांच्या एका अभ्यासक्रमाची सांगता नुकतीच पूर्ण झाली. अभ्यासक्रमांत युरोप, आशिआ, आफ्रिका व अमेरिका खंडांतील १५० तरुणांनी भाग घेतला होता.

**राजकीय पुढाऱ्यांवर आरोप**—सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखक व तत्त्वज्ञ अर्ल रसेल ह्यांना अणुशस्त्रांविरुद्ध मोहीम चालविण्याबद्दल अटक करण्यांत आल्यावरहि त्यांच्यातर्फे हा प्रचार चालूच आहे. त्यांनीं तुरुंगांतून एक पत्रक काढलें आहे. पत्रकांत त्यांनीं जगांतील बड्या राजकीय पुढाऱ्यांवर असा आरोप केला आहे कीं, अणुशस्त्रांची शर्यत खेळून ह्या पुढाऱ्यांना मनुष्यजात नष्ट करावयाची आहे. अमेरिका, रशिआ, जर्मनी, फ्रान्स व ब्रिटन ह्यांमधील पुढाऱ्यांचा पत्रकांत उल्लेख आहे.

**पश्चिम जर्मनीची भारताला मदत**—भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून पश्चिम जर्मनीनें ५० कोटी मार्कसचें कर्ज द्यावयाचें कबूल केलें आहे. ह्या कर्जापैकी १७ कोटी मार्कसचा शेवटचा हप्ता देण्याबद्दलच्या करारावर उभयता देशांच्या प्रतिनिधींनीं नुकत्याच सह्या केल्या. शेवटच्या हप्त्याची परतफेड १९६८ पासून २० वार्षिक हप्त्यानें करावयाची आहे.

**कोळशाच्या वाहतुकीचा प्रश्न**—कलकत्त्याच्या परिसरांत असणाऱ्या उद्योगधंद्यांना वेळेवर कोळसा पुरवतां यावा म्हणून भारत सरकारच्या खाणीखात्यानें दुर्गापूर कालव्याचा उपयोग तांतडीनें करण्याची योजना आंखली आहे. हा कालवा पुढील वर्षाच्या जुलैमध्यें तयार होईल. कालवा १२० मैल लांबीचा होईल व त्यामधून दरसाल २० लाख टन कोळशाची वाहतूक होऊं शकेल.

**नेपाळला रशिआची मदत**—सोव्हिएट रशिआच्या मदतीने नेपाळच्या सरकारने कांहीं नवीन उद्योगधंदे काढले आहेत. त्यांत एक सिगरेटचा कारखाना, एक वीजनिर्मिति केंद्र, ह्यांचा समावेश आहे. नेपाळमधून पूर्व-पश्चिम जाणाऱ्या ५०० मैल लांबीच्या संकल्पित रस्त्याच्या पहाणीचें कामहि रशिअन तज्ज्ञामार्फत चालू आहे. आतांपर्यंत रशिआनें नेपाळला ३ कोटी रुबलसची मदत केली आहे. रशिआकडून नेपाळला आणखीहि मदत मिळणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ४ ऑक्टोबर, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील भांडवल गुंतवणूक

इंडिअन मर्चंटस् चेंबरचे अध्यक्ष श्री. वल्लभदास माडीवाला ह्यांनीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत यावयाच्या भांडवलगुंतवणुकीविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. संघटनेच्या तिमाही सर्वसाधारण सभेपुढें ते बोलत होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भांडवल-गुंतवणुकीच्या अनेक योजना जाहीर करण्यांत आलेल्या आहेत. ह्या योजनांचा अधिक काळजीपूर्वक विचार करून देशांतल्या देशांत जितकें भांडवल उभें करतां येणें शक्य असेल त्यामानानें योजनांत फेरबदल करण्यांत आले पाहिजेत. परदेशांतून भारताला मिळणाऱ्या मदतीचें लक्ष्य गांठतां येणें शक्य झालें नाहीं तर ह्या योजनांवर परिणाम होणार नाहीं अशी दक्षता घेतली गेली पाहिजे. परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीचीं नक्की आश्वासनें मिळाल्याखेरीज अशा मदतीवर विसंबून राहाणें योग्य होणार नाहीं. कारण त्यामुळें भांडवलगुंतवणुकीचें लक्ष्य गांठणें अनिश्चित स्थितींत राहील. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा पैसा गोळा करण्याची कांहीं एक पद्धत ठरविण्यांत आली आहे व उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत खाजगी मालकीच्या विभागाकडे कांहीं कामगिरी सोंपविण्यांत आली आहे. परंतु ह्या विभागाला आपल्या हालचालींत अधिक स्वातंत्र्य देण्यांत आल्याशिवाय सोंपविलेली कामगिरी पार पाडतां येणार नाहीं. निदान तसें करणें अवघड जाईल. सार्वजनिक मालकीच्या विभागांत भांडवलगुंतवणुकीपैकीं कांहीं विशिष्ट रक्कम गुंतवावयाचीच अशा साचेबंद दृष्टिकोणांतून ह्या प्रश्नाकडे पाहातां कामा नये. सर्वच भांडवलगुंतवणुकीचा साकल्यानें विचार करण्यांत आला पाहिजे. म्हणजे प्रश्नाचें यथार्थ स्वरूप लक्षांत येईल.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १,७१० कोटी रुपयांचे नवे कर बसविण्यांत येणार आहेत. सरकारचें करविषयक धोरण व करआकारणीचीं अधिक उच्च लक्ष्यें हीं दोन्हींहि सदोष आहेत. कारण, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करपद्धतीची सध्यांची रचना आणि करांची सध्यांची पातळी ह्यांचा विचार करण्यांत आलेला नाहीं. त्याचबरोबर वाढत्या किंमतीचा प्रश्नहि वाऱ्यावर सोडून देण्यांत आलेला आहे. करविषयक धोरण, कराबद्दलचीं लक्ष्यें आणि वाढत्या किंमती ह्यांची तज्ज्ञांकडून अधिक अभ्यास व तपासणी करवून घेण्याची आवश्यकता आहे. ब्रिटन युरोपिअन सामायिक बाजारपेठेंत सामील झाले तर भारताच्या निर्यात व्यापाराला सुमारें ४० कोटी रुपयांचा फटका बसेल असा अंदाज आहे. ब्रिटननें सामायिक बाजारपेठेंत सामील होण्याचा निर्णय घेतला तर भारत सरकारपुढें आणि कारखानदार–व्यापाऱ्यांपुढें एक आव्हानच खडें होईल. ह्या आव्हानाला तोंड देऊन भारताचा निर्यात व्यापार वाढविणें, निदान त्यांत घट होऊं न देणें, अतिशय अगत्याचें आहे. म्हणून भारत सरकार आणि कारखानदार–व्यापारी ह्यांनीं अधिक सहकार्य केलें पाहिजे. आज परदेशांकडून मदत मिळत असली तरी निर्यात व्यापाराची घट झाल्यास ती तशीच मिळत राहील असें मानतां येणार नाहीं, म्हणूनच देशांतर्गत भांडवल-उभारणी व त्याची गुंतवणूक ह्या बाबतींत अधिक काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. नाहींतर स्वयंचलित विकासक्षम अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या कामांत कठीण अडथळे निर्माण होण्याचा संभव आहे.

---

## आग्नेय आशियांतील लोकांच्या आहाराचा प्रश्न

जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिआ विभागाच्या कमिटीची बैठक उटकमंड येथें भरली होती. जगाच्या ह्या भागांतील लोकांच्या आहाराविषयीं मत व्यक्त करतांना कमिटीनें असें म्हटलें आहे कीं ह्या भागांतील लोकांचा आहार सकस नाहीं. त्यामुळें रोगराईचें प्रमाण इतर प्रगत देशांच्या मानानें अधिक आढळून येतें. लोकांच्या आहारांत प्रथिनयुक्त, जीवनसत्त्वयुक्त आणि आरोग्यास जरूर असणारें क्षारयुक्त असें अन्न कमी प्रमाणांत असतें. म्हणून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनें आहाराची सुधारणा करणें अतिशय आवश्यक झालें आहे. आरोग्याचें रक्षण करणाऱ्या अन्नाचें अधिक उत्पादन करण्यांत आलें पाहिजे आणि कमींत कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना परवडेल अशा किंमतीला तें पुरविण्यांत आलें पाहिजे. पण लोकांचा आहारविषयक प्रश्न एवढ्याच बाबींपुरता मर्यादित नाहीं. लोकांच्या खाण्याच्या सवयीहि सुधारल्या पाहिजेत. मनुष्याचें आरोग्य टिकण्यास समतोल आहाराची गरज प्रामुख्यानें असते. परंतु पुष्कळ लोकांना ह्यासंबंधीची माहितीच नसते. त्यामुळेंहि सकस अन्नाच्या अभावीं होणारे रोग लोकांत पसरलेले दिसतात. राहण्याच्या जागाहि पुष्कळदां आरोग्याला पोषक नसतात त्यामुळें आतड्याचे विकार होण्यास अनुकूल परिस्थिति मिळते. अलीकडे आग्नेय आशिआचें औद्योगिकरण होऊं लागलेलें आहे. औद्योगिकरण वाढत जाईल त्या मानानें शहरांची लोकसंख्या वाढत जाईल आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आणखीच बिकट होत जाईल असें दिसतें. शिवाय अलीकडे संस्कारित डबाबंद अन्नपदार्थ खाण्याचें प्रमाण वाढत चाललेलें आहे. त्याचाहि लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. हा प्रश्न आर्थिक-सामाजिक स्वरूपाचा असल्यानें आग्नेय आशिआंतील सरकारांनीं त्याचा एकत्रित येऊन विचार केला पाहिजे.

---

## प्राइज बॉंड्सचें आकर्षण मावळलें

भारत सरकारच्या प्राइज बॉंड्सच्या योजनेचें आकर्षण कमी होत चाललें आहे. १९६०–६१मध्यें १५.६ कोटी रुपयांच्या प्राइज बॉंड्सची विक्री झाली; चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत फक्त १.५ कोटी रुपयांचे बॉंड्स खपले आहेत. अल्प-बचतीच्या योजनेस ह्या बॉंड्सचा भरपूर हातभार लागावा, ह्यासाठी त्यांची लोकप्रियता वाढवायला हवी. सध्यां त्यावर मुळींच व्याज मिळत नाहीं; तें दिलें गेलें तर बरें होईल. फारच थोड्या लोकांना बक्षिसें मिळतात; बाकीच्यांना निदान थोडें व्याज तरी हवें.

### भारत रशियाचें चवथ्या अनुक्रमाचें गिऱ्हाईक

भारताची रशियाकडील निर्गत वाढत आहे, हें खालील तक्ता दर्शवितो :—

| एप्रिल–मार्च | कोटि रु. |
|---|---|
| १९५३–५४ | १·१५ |
| १९५४–५५ | २·१२ |
| १९५५–५६ | ३·२६ |
| १९५६–५७ | १५·३२ |
| जाने. – डिसें. | |
| १९५७ | १७·४८ |
| १९५८ | २३·५१ |
| १९५९ | ३०·३३ |

भारताच्या एकूण निर्गतीच्या फक्त ०·२% निर्गत १९५०–५१ मध्यें रशियाकडे झाली होती; आतां तें प्रमाण ४·८% वर गेलें आहे. जागतिक बाजारपेठेंत रशिया हें भारताचें ४ थ्या अनुक्रमाचें गिऱ्हाईक आहे; पहिले तीन अनुक्रम ग्रेट ब्रिटन, अमेरिका व जपान ह्यांचे आहेत. रशियाचा व्यापार भारताप्रमाणें इजिप्त, इंडोनेशिया, मलाया, बर्मा, सिलोन, इत्यादि देशांशींहि वाढत आहे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला रशियांत बनविलेल्या घड्याळांच्या आयातीचें लायसेन्स मिळालें आहे. तीं घड्याळें २६ रु. ( १६ ज्युवेल्स स्टील केस ), २८ रु. ( १६ ज्युवेल्स रोल्ड गोल्ड केस), ३० रु. ( १७ ज्युवेल्स रोल्ड गोल्ड केस ), ५० रु. ( २० ज्युवेल्स ऑटोमॅटिक ) इतक्या स्वस्त किंमतीला भारतांत दाखल होतील.

---

### हिंदी पोलादाच्या निर्गतीची शक्यता फार कमी आहे

आफ्रिकन, अरब व आशिआई देश पोलादाचे कारखाने उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु, त्यांत तयार होणारें पोलाद महाग राहाणार, असें दिसतें. भारत लवकरच पोलादाची निर्गत करूं शकेल, ही आशा खोटी ठरण्याचा संभव आहे. कारण, वाढती मजुरी, कच्च्या मालाची वाढती किंमत, भांडवलाची वाढती गरज, कोळशाच्या दर्जात घट, इत्यादि कारणांमुळें हिंदी पोलादाला जागतिक बाजारपेठेंत टिकाव धरणें कठीण जाईल. खालील तक्त्यांत पोलादाच्या जागतिक उत्पादनाचे तुलनात्मक आंकडे दिले आहेत :—

( आकडे हजार मेट्रिक टनांचे )

| | १९५९ | १९६० | वाढ अथवा घट % |
|---|---|---|---|
| प. जर्मनी | २९,४३५ | ३४,१०० | +१५·८ |
| ग्रेट ब्रिटन | २०,५१० | २४,६९५ | +२०·४ |
| फ्रान्स | १५,१९७ | १७,२९४ | +१३·८ |
| इटली | ६,७६२ | ८,२१९ | +२१·५ |
| बेल्जम | ६,४३४ | ७,१७६ | +११·५ |
| रशिया | ५९,९५० | ६५,३०० | + ८·९ |
| चीन | ११,००० | १५,००० | +३६·४ |
| अमेरिका | ८४,७७३ | ९०,०६८ | + ६·२ |
| जपान | १६,६२९ | २२,१४३ | +३३·२ |
| कॅनडा | ५,३७४ | ५,५२० | + २·७ |
| ऑस्ट्रेलिया | ३,४२० | ३,७१० | + ८·५ |
| भारत | २,४६६ | ३,१२० | +२६·५ |

---

### सरकारच्या मालकीच्या तेल कंपनीचा विस्तार

इंडिअन ऑईल कंपनी ह्या सरकारच्या मालकीच्या तेल कंपनीला पहिल्या वर्षांत २,५०,००० रुपये तोटा सहन करावा लागला. तथापि चालू वर्षअखेर कंपनी आपला सर्व खर्च उत्पन्नांतून भागवूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कंपनीचे अध्यक्ष श्री. निजलिंगप्पा कंपनीसंबंधीं वार्ताहरांजवळ बोलतांना म्हणाले की, कंपनीला आलेला तोटा कंपनीला तोंड द्याव्या लागलेल्या प्राथमिक अडचणीमुळें आला. कंपनीनें बाजारपेठेंत पाठविलेल्या मालाच्या किंमती कमी असल्यामुळें तोटा आला हें म्हणणें बरोबर नाहीं. आपल्या मालाची विक्री सर्व देशभर नीट करतां यावी म्हणून कंपनी स्वतःची विक्री संघटना उभारीत आहे. गोहाटी आणि बरौनी येथील सार्वजनिक तेलशुद्धीच्या कारखान्यांतून पेट्रोलजन्य माल तयार करण्यांत येईल, तो कंपनीतर्फे बाजारांत विकला जाईल. त्याशिवाय पूर्व युरोपीय देशांकडून आयात करण्यांत येणारा तेलजन्य मालहि कंपनी विकील. पूर्व युरोपीय देशांकडून मिळणाऱ्या मालाची किंमत रुपयांत द्यावयाची आहे. चालू वर्षी बंदरांतून तेलजन्य पदार्थांच्या सांठ्याची व्यवस्था करण्याचा कंपनीचा विचार आहे. सुमारें १,३५,००० टन तेलजन्य माल सांठविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. देशाच्या अंतर्गत भागांत ज्या ठिकाणीं तेलाची नेहमी गरज लागते, त्याहि ठिकाणीं तेलपदार्थांच्या सांठ्याची व्यवस्था करण्याचा कंपनीचा हेतु आहे. बंदरामधील तेलसांठ्याची व्यवस्था करण्यासाठीं १·३५ कोटी रुपये खर्च येणार आहे आणि अंतर्गत भागांतील सांठ्याची व्यवस्था करण्यासाठी १ कोटी रुपये खर्च येणार आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १२ कोटी रुपयांचें असून वसूल भांडवल १॥ कोटी रुपयांचें आहे. पुढील मार्चपर्यंत देशांत २०० पेट्रोलचे पंप बसविण्याचा कंपनीचा इरादा आहे.

---

### बँका बंद झाल्याचा परिणाम

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि. चें आगीच्या विम्याचें व इतर विम्यांचें काम सालोसाल वाढत आहे. १९६० मध्यें तर कंपनीनें खूपच प्रगति केली आहे; कंपनीनें स्वतः स्वीकारलेल्या विम्यांच्या हप्त्यांचें उत्पन्न सुधारलें आहे. तथापि, त्याला दोन दुर्दैवी घटनांमुळें गालबोट लागलें आहे. प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेला मोरेटोरियम लागू करण्यांत आला; त्या बँकेचे १,४२,५०० रु. भरणा झालेले भाग १५ वर्षांपूर्वी कंपनीनें घेतले, तेव्हांपासून त्यांवर डिव्हिडंड मिळालेलें नाहीं. ही संबंध रक्कम लिहून टाकावी लागेल, इतकेंच नव्हे तर ५०,००० रु. चे कॉल केले आहेत तेहि रोख भरावे लागतील. न्यू सिटिझन बँकेलाहि मोरेटोरियम लागू करण्यांत आला व ती बरोडा बँकेंत विलीन झाली. ह्या बँकेंत कंपनीचे ३८,३९९ रु. होते, त्यांपैकीं ६६% रक्कम कंपनीच्या बरोडा बँकेकडील नव्या खात्यांत वर्ग झाली; पण उरलेले १२,९७१ रु. "कलेक्शन अकाउंट" मध्यें वर्ग झाले आहेत. १९६० मध्यें कॉमनवेल्थ कंपनीला ६०,२९६ रु. नफा होऊनहि तो वरील दोन आपत्तींना तोंड देण्यास समर्थ नाहीं. तो नफा लिहून टाकून राहिलेला १,२१,६८५ रु. तोटा ताळेबंदांत दाखविण्यांत आला आहे. तरी, कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्सनें केलेल्या 'सॉल्व्हन्सी मार्जिन' मध्यें कंपनी बसत असून वाढत्या धंद्यांतून कंपनीची परिस्थिति सुधारत जाईल अशी अपेक्षा आहे.

---

## गणरायाला विनंती

**आरोग्य राख आणि कारखानदारी करण्याची बुद्धि दे.**

दहा रुपये रोज मिळविण्यापेक्षा दहा जणांचे पोशिंदे होण्याची महत्त्वाकांक्षा असणें हीच यशाची खरी-गुरुकिल्ली आहे व त्यासाठी आपण नोकऱ्या न करतां व्यापारांत पडले पाहिजे; कारखानदारी केली पाहिजे. आपल्या देशांत इंग्रज व्यापाराच्या निमित्तानें येथें आला व स्वतःचा माल भारतांत विकून इंग्रजांनीं सोनें लुटून नेलें. लोकमान्यांनीं हें ओळखलें. गिरण्या व कारखाने काढण्याला उत्तेजन दिलें. आज जगाच्या बाजारांत भारताचा माल कोट्यवधी रुपयाच्या किंमतीचा निर्यात होत आहे. त्यामुळें इंग्रज हादरला. कारखानदारीस चिकाटी, विवेक, आत्मविश्वास व प्रयत्न याची सांगड असली पाहिजे.

माझी कारखानदारी मी माझ्या आरोग्याच्या जोरावर यशस्वी करूं शकतों. माझे वयास ७० वर्षे झालीं. मी कधींहि आजारी पडलों नाहीं. माझ्या छातीवर घणाचे ८–१० घाव घातले गेले तरीपण मी टणकपणें जिवंत राहिलों. यासाठी आपण गणरायापुढें एवढीच विनंती करूं कीं ' आम्हांला चांगलें आरोग्य राखण्याची बुद्धि दे व नोकऱ्याऐवजीं कारखानदारीकडे आमचें लक्ष वेधव.

गजानन मिलचे धनि, श्री. वेलणकर, ह्यांचें व्याख्यान.

---

## आयुर्विम्याचे दर कमी होणार नाहींत

भारतानें दोन पंचवार्षिक कार्यक्रम पुरे केल्यामुळें देशांतील लोकांच्या आयुर्मानाची अपेक्षा वाढली आहे असें सांगण्यांत येतें. तरीसुद्धां आयुर्विम्यासाठी द्याव्या लागणाऱ्या हप्त्याच्या दरांत नजीकच्या भविष्यकाळांत तरी कपात करण्यांत येण्याची शक्यता नाहीं. विम्याचे हप्ते आयुष्याच्या अपेक्षेवर आधारलेले असतात. ५॥ वर्षांपूर्वी आयुर्विम्याच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. त्या वेळीं ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कंपनीचे जे दर होते, त्यापेक्षा आयुर्विमा कॉर्पोरेशनचे दर १ रुपयांनीं कमी ठेवण्यांत आले. ओरिएंटल कंपनीचे दर इतर विमा कंपन्यांच्या मानानें थोडे अधिक होते. पॉलिसींची व्यवस्था पाहणें व नवा धंदा मिळविणें ह्यांचा खर्च वाढल्यामुळें आतां दरांत इतक्यांतच अधिक कपात होणार नाहीं.

---

## प्रलयांतून पुनर्वसनाकडे

मुठा नदीला १२ जुलै रोजीं येऊन गेलेल्या महापुरानें जो प्रलय झाला त्याला पुण्यांतील जनतेनें किती धैर्यानें तोंड दिलें याचें सिंहावलोकन करणारी 'प्रलयांतून पुनर्वसनाकडे' ही पुस्तिका महाराष्ट्र सरकारच्या प्रकाशन खात्यानें प्रकाशित केली आहे. जलप्रलयानंतर सरकारी अधिकारी, लष्कर, नागरिक, सर्वांनीं केलेल्या पुनर्वसन प्रयत्नांचा मागोवा घेतांनाच उद्यांच्या पुनर्वसन योजनांचें स्वरूप, सरकारी मदत, घरबांधणी, पाणीपुरवठा, या सर्व समस्या सोडविण्याचा कसा प्रयत्न झाला व चालू आहे याचेंहि सविस्तर वर्णन या पुस्तिकेंत आहे. पुस्तिकेमध्यें नुकसानीचा अहवाल अगर आंकडेवारीपेक्षा गेल्या दोन–अडीच महिन्यांतील पुण्यांतील जनतेचें जीवनानुभव देण्याचा प्रयत्न केला आहे. विविध सरकारी योजनांची तपशीलवार माहिती देणारी ही पुस्तिका पुण्यांतीलच नव्हे, तर पुण्याबाहेरील नागरिकांनाहि पुनर्वसनाबाबतच्या प्रयत्नांची यथार्थ कल्पना देईल. आकर्षक मुखपृष्ठ असलेल्या २० पानी पुस्तिकेची किंमत फक्त २५ नये पैसे आहे. पुस्तिकेंत प्रलयाची व पुनर्वसनाची कल्पना देणारीं भरपूर छायाचित्रें आहेत. या पुस्तिका पुण्यांतील नागरिकांना प्रादेशिक प्रसिद्धि कार्यालय, २१ आंबेडकर रोड, पुणें—१ अगर प्रसिद्धी खात्याचें माहिती केंद्र, विश्रामबागवाडा, पुणें—२, येथें नेमून दिलेल्या किंमतीस मिळतील.


सेवा आणि सुरक्षितता
यांसाठी
**दि बेळगांव बँक लिमिटेड**
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव
स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

**बँक अल्प मुदतीच्या ठेवी**
आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.
—आजच चौकशी करा—
होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर व्याज ३%
एक ते सहा वर्षें मुदतठेवीवर व्याज ४% ते ५%
सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एस्सी., एलूएल्. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर



**दि मिरज स्टेट बँक, लि.**
हेड ऑफिस : मिरज
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९११

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर
१ वर्ष ३¾% ३ वर्षे ४½%
२ वर्षे ४% ४ वर्षे ५%
५ वर्षे ५%

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, अॅड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

## भिलई येथील कारखान्याचा विस्तार

मध्यप्रदेशांत भिलई येथें रशिआच्या मदतीनें स्थापन करण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. पोलादाच्या धंद्यांतील ८ रशिअन तज्ज्ञ भिलइला येऊन दाखल झाले आहेत. भिलई येथील कारखान्यांत काम करणाऱ्या हिंदी एंजिनिअर्सबरोबर रशिअन तज्ज्ञ विस्ताराच्या योजनेबद्दल चर्चा करणार आहेत. सध्यां ह्या कारखान्यांत दरसाल १० लाख टन पोलाद तयार करणारी यंत्रसामग्री आहे. विस्तारयोजना पुरी झाल्यावर दरसाल २५ लाख टन पोलाद निर्माण होऊं शकेल. रशिअन तज्ज्ञांच्या तुकडींत एक स्त्री–एंजिनिअर आहे. तुकडीनें भिलई कारखान्याची पहाणी केली आहे. दुर्गापूर व रूरकेला येथील पोलादाचे कारखाने पाहाण्याची इच्छाहि रशिअन तज्ज्ञांनीं व्यक्त केली आहे.

## गबाळ्या पोषाखाच्या बाबतींतहि पहिला

पुरुषांच्या पोषाखाच्या अव्यावत्पणाची काळजी वाहणाऱ्या अमेरिकेंतील शिंप्यांच्या संघटनेनें गबाळा पोषाख करणाऱ्या जगांतील पहिल्या १० पुरुषांची निवड केली आहे. ह्या स्पर्धेत पहिला नंबर रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांना देण्यांत आला आहे. रशिअन पंतप्रधानांचे खाली अमेरिकेचे अॅडलाय स्टीव्हन्सन, इजिप्तचे नासर आणि ड्यूक ऑफ विंडसर ह्यांचे नंबर पहिल्या दहा जणांत लावण्यांत आले आहेत. ड्यूक साहेब प्रिन्स ऑफ वेल्स होते त्यावेळीं नीटनेटक्या पोषाखाबद्दल त्यांची सर्व युरोपांत ख्याति होती. ह्या यादींत उत्तर व्हिएट नामचे अध्यक्ष डॉ. हो-चि-मिन्ह ह्यांचा नंबर न लावल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे.

## उत्तर प्रदेशांत खताचा कारखाना

उत्तर प्रदेशांत गोरखपूर येथें जपानच्या पद्धतीनें एक खताचा कारखाना काढण्यांत येणार आहे. जपानमधील आठ एंजिनिअरिंग कंपन्यांचा संघ व भारत सरकार ह्यांच्या दरम्यान कारखान्याच्या उभारणीबद्दल लवकरच करार करण्यांत येणार आहे. जपानी कंपन्यांनीं आपले १४ तंत्रज्ञ कारखान्याच्या योजनेची पाहाणी करण्याकरतां पाठविले होते. त्यांनीं महिनाभर खपून आपली पाहाणी पुरी केली आहे. दरसाल १,८०,००० टन युरिआ खत उत्पादन करूं शकणारा कारखाना काढण्याची शिफारस ते करतील असा अंदाज आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीसाठीं ४·७ कोटी डॉलर्स द्यावे लागतील व तो १९६५ मध्यें प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करील. जपानी कंपन्या तांत्रिक मदतीबरोबर २·५ कोटी डॉलर्सची मदतहि देण्यास तयार आहेत.

## नवसारी येथें औद्योगिक वसाहत

नवसारी येथें एका सहकारी संस्थेतर्फे औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यांत येणार आहे. औद्योगिक वसाहतीचें नांव नवसारी उद्योगनगर सहकारी संघ असें ठेवण्यांत आलें आहे. संघानें वसाहतीसाठीं ४५ एकर जमीन मिळविली असून तिचे ५६ प्लॉटस पाडून ते संघाच्या सभासदांना लवकरच देण्यांत येणार आहेत. वसाहत झाल्यानंतर सुमारें १,००० लोकांना रोजगार मिळेल असा अंदाज आहे. वरील जागेशिवाय आणखी २१३ एकर जमीन मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. संघानें तयार केलेली वसाहतीची योजना गुजरात सरकारमार्फत भारत सरकारकडे पाठविण्यांत आली होती. तिला नुकतीच मान्यता मिळाली आहे. वसाहत स्थापन करण्यासाठीं एकूण ५·५ लाख रुपये खर्च येईल.

## लेखकांची सहकारी संस्था

मद्रास राज्यांतील तामीळ भाषेंतील लेखकांनीं आपली सहकारी संस्था स्थापन केली आहे. संस्थेचे सभासद असलेल्या लेखकांच्या पुस्तकांच्या प्रकाशनाला मदत करणें हा संस्थेचा प्रधान हेतु आहे. तथापि तामीळ लेखकांची आर्थिक व सांस्कृतिक उन्नति घडवून आणण्याचें उद्दिष्टहि पुढें ठेवण्यांत आलें आहे. मद्रास राज्याच्या निरनिराळ्या भागांतील ६५ लेखक संस्थेचे सभासद झाले आहेत. मान्यता पावलेल्या कोठल्याहि लेखकाला संस्थेचे सभासद होता येते. उपयुक्त विषयावरील पुस्तकांच्या प्रसिद्धीसाठीं संस्था एजंटाचें काम करील. त्याशिवाय पुस्तकाच्या लेखकांना सरकारकडून कॉपीराइटचे व भाषांतराचे हक्क मिळवून देण्याची खटपटहि करील.

## कामगारांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम

येत्या पांच वर्षांत ३ लाख औद्योगिक कामगारांना शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहे. कामगारांना शिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या त्रिपक्षीय मध्यवर्ती बोर्डापुढें भाषण करतांना मध्यवर्ती सरकारचे मजूरमंत्री श्री. नंदा ह्यांनीं ही माहिती सांगितली. ते पुढें म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें यशापयश कामगार बदलत्या सामाजिक परिस्थितीशीं कसें जुळवून घेतात ह्यावर बरेंचसें अवलंबून आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कामगारांच्या शिक्षणासाठीं २ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. आतांपर्यंत ११,८०० कामगारांचें शिक्षण पूर्ण झालें असून ७,५०० कामगारांचें चालू आहे. ह्या कामासाठी मध्यवर्ती बोर्डानें १२ विभागीय केंद्रांची स्थापना केली आहे.

## हातमाग धंद्यासाठी फायनॅन्स कॉर्पोरेशन

हातमागाच्या धंद्याला आर्थिक मदत देण्यासाठी एका फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्याचा विचार मद्रास सरकार करीत आहे. ह्यासंबंधींची तपशीलवार योजना तयार झाली कीं ती अखिल भारतीय हातमाग बोर्डाकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत येईल. कॉर्पोरेशनच्या भांडवल उभारणीस मदत म्हणून राज्य सरकार १० लाख रुपये गुंतविणार आहे. हातमागाच्या धंद्याकडून आणखी इतकीच रकम भांडवलादाखल गोळा करण्यांत यावयाची आहे. हातमाग चालविणारे जे कोष्टी सहकारी संस्थांतून संघटित झालेले नाहींत त्यांना कॉर्पोरेशन मदत देणार आहे. शिवाय कॉर्पोरेशन व्यापारी स्वरूपाचें काम करणार आहे.

## मेट्टूर धरणाची उंची वाढवावी काय ?

गेल्या महिन्यांत हिंदमधील नद्यांना आलेल्या पुराबद्दल लोकसभेंत चर्चा करण्यांत आली. त्या वेळीं दक्षिण भारतामधील मेटूर धरणाबद्दल सरकारतर्फे माहिती देण्यांत आली. ती अशी. मेटूरचें धरण १९३४ सालीं बांधण्यांत आलें. तेव्हांपासून फक्त दोनदां म्हणजे १९५९ व १९६१ सालीं धरणावरून पाणी जाण्याचा प्रसंग ओढवला. सामान्यपणें मेटूरच्या धरणांत पाण्याचा सांठा कमीच असतो. कावेरी नदीवर बांधण्यांत आलेल्या ह्या व कृष्णराजसागर धरणामुळें नदीचा इतर कोठल्याहि नदीपेक्षा अधिक चांगला उपयोग करण्यांत आलेला आहे. कावेरी नदीला पूर आला तर येणारें जादा पाणी सांठविण्यासाठी मेटूर धरणाची उंची वाढवावी अशी सूचना करण्यांत आली आहे. पण कावेरीला पूर नेहमीं येत नाहींत. त्यामुळें धरणाची उंची वाढविण्याची सूचना आर्थिक दृष्ट्या योग्य न ठरण्याचा संभव आहे. त्यापेक्षा कावेरीच्या उपनद्यांवर अधिक धरणें बांधणें उपयुक्त ठरेल.

### मळेवाल्यांनीं मालाचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता

दक्षिण भारतामधील युनायटेड प्लँटर्स असोसिएशन ह्या संघटनेची ६८ वी वार्षिक सभा कुन्नूर येथें भरली होती. सभेचें उद्घाटन भारताचे अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चहा आणि कॉफी ह्यांच्या उत्पादनाचें व निर्यातीचें लक्ष्य कांहींसें उच्च ठेवण्यांत आलेलें आहे ही गोष्ट खरी. तथापि तें गाठणें अशक्य मानण्याचें कारण नाहीं. शेतीच्या धंद्याला आज उपलब्ध असलेलीं शास्त्रीय साधनें वापरण्यांत आलीं तर ह्या बाबतींत निराशा होण्याचा प्रसंग येणार नाहीं. जगांतील सर्वच देशांत चहा आणि कॉफी ह्यांचा खप कमीअधिक प्रमाणांत वाढत चाललेला आहे. फक्त भारताचेंच उदाहरण घेतलें तरी गेल्या १० वर्षांत ह्या पदार्थांचा खप २० टक्क्यांनीं वाढल्याचें दिसून येतें. पाकिस्तानमधील खप चौपटीनें वाढला आहे, सीलोन मधील खप ६० टक्क्यांनीं वाढला आहे. आणि जपानमधील खप दुप्पट झाला आहे. एकंदरीनें जगांतील चहा–कॉफीचा खप ५० टक्क्यांनीं वाढलेला आहे. चहाच्या देशांतील खपावर निर्बंध घालून त्याच्या निर्यातींत वाढ करण्यांत यावी अशी सूचना करण्यांत येत असते. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या यशासाठी भारताला परदेशीय चलनाची अतिशय गरज आहे. म्हणून चहाच्या व कॉफीच्या मळेवाल्यांनीं आपल्या मालाचा दर्जा सुधारण्यावर भर दिला पाहिजे. भारतामधील चहाचा अगर कॉफीचा दर्जा इतर देशांतील दर्जापेक्षा कमी नाहीं म्हणून समाधान मानतां कामा नये. हा दर्जा इतर देशांपेक्षा अधिक चांगला असला पाहिजे.

### कलकत्ता शहरांतील रस्त्यांचा बिकट प्रश्न

कलकत्ता शहराची सुधारणा करणें सध्यांच्या कॉर्पोरेशनला जमणार नाहीं अशी टीका करण्यांत येत आहे. कॉर्पोरेशनपुढें असलेल्या प्रश्नांत सर्वांत बिकट प्रश्न शहरांतील रस्त्यांवरील वाहतुकीचा आहे. गेल्या कांहीं वर्षांत कलकत्त्यामधील वाहतूक अधिक गुंतागुंतीची झालेली आहे. मागील २० वर्षांच्या अवधींत कलकत्त्यामधील उद्योगधंदे व व्यापार ह्यांची खूप वाढ झालेली आहे. भारतामधील इतर कोठल्याहि शहरांपेक्षा आज कलकत्त्यामधील कामगारांची संख्या अधिक आहे असें म्हणतात. भारताच्या आयातींपैकीं ४५ टक्के आयात कलकत्ता बंदरांतून होते. त्यामुळें कलकत्त्याच्या विकासाला बरीच अडचण होत आहे. त्याशिवाय पूर्व पाकिस्तानमधून लाखों निर्वासित शहरांत आले असल्यानें नागरी जीवन फार मोठ्या प्रमाणावर विस्कळित झालें आहे. शहरांतील वाहनांच्या संख्येंत गेल्या १० वर्षांत बरीच वाढ झाली आहे. त्यांची संख्या ७१ हजारांवरून ९९ हजारांवर गेलेली आहे. रस्ते मात्र २० वर्षांपूर्वींचेच आहेत. रस्त्यांची एकूण लांबी ४८५ मैल आहे. रस्त्यांची दुरुस्ती कॉर्पोरेशनकडून नीट होत नाहीं. त्यामुळें रस्त्यावरील अपघातांची संख्याहि वाढत चाललेली आहे. १९५१ मध्यें रस्त्यांवरील अपघातांत सांपडून ७१ माणसें ठार झालीं होतीं. १९६० सालीं अशा अपघातांत सांपडून प्राण गमावलेल्यांची संख्या २८९ झाली आहे. कलकत्ता शहरांत दरमहा २०० किरकोळ अपघात होतात. लंडन शहरांत प्रत्येक १,३०० वाहनांच्या मागें एक जीवघेणारा अपघात होतो. पण कलकत्ता शहरांत हें प्रमाण त्याच्या तिप्पट आहे. तेथें प्रत्येक ३२२ वाहनामागें एक जीवघेणारा अपघात होतो. कलकत्ता शहरांतील निरनिराळ्या प्रकारांच्या मोटारींची वाहतूक गेल्या १० वर्षांत ५० टक्क्यांनीं वाढली आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३८,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १८ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ७९ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडली जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरू झालेल्या ५ नव्या शाखा —

सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा

—१ जुलै, १९६१ पासून सुरू झालेल्या ७ नव्या शाखा—

लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, सापोली, बारामती, श्रीरामपूर, ओझर (ताम्बट)

जनरल मॅनेजर

## साखर अधिक निर्यात करण्याचे प्रयत्न

इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या निर्यात विभागाचे अध्यक्ष श्री. एस्. एस्. कानोरिआ, जिनीव्हा येथें भरणाऱ्या इंटरनॅशनल शुगर ॲग्रिमेंट ह्या संघटनेच्या बैठकीला हजर राहण्यासाठी तिकडे गेले आहेत. परदेशप्रयाणापूर्वी वार्ताहर–परिषदेंत बोलतांना ते म्हणाले कीं अमेरिकेव्यतिरिक्त इतर देशांना साखर पाठविण्याच्या भारताच्या हिश्शांत वाढ करण्याची खटपट बैठकींत करून करण्यांत येईल. भारताच्या निर्यात व्यापारांत अलीकडे साखर ही एक महत्त्वाची वस्तु झालेली आहे. साखरेच्या धंद्याच्या दृष्टीनेंच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेंहि ही घटना फार अर्थपूर्ण आहे. १९६१ मध्यें तागाच्या खालोखाल डॉलर्स मिळविण्याच्या कामांत साखरेचा अनुक्रम लागण्याचा दाट संभव आहे. १९६१ च्या जून मध्यें २,२५,००० टन साखर अमेरिकेला निर्यात करण्याची परवानगी भारताला देण्यांत आली. पण, निर्यातींत हा वांटा देतांना भारतानें इंटरनॅशनल शुगर ॲग्रिमेंट ह्या संघटनेचे सभासद झाले पाहिजे अशी अट घालण्यांत आली होती. त्याप्रमाणें भारतानें सभासदत्वासाठी अर्ज केला आणि तो मान्यहि करण्यांत आला. सभासद झाल्यावर अमेरिकेशिवाय इतर देशांना १,५०,००० टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली. देशांतील ग्राहकांना साखर अधिक स्वस्त देण्याच्या कामीं साखरेशीं संबंध असलेल्या सर्व गटांनीं कांहीं प्रमाणांत त्याग केला पाहिजे. साखर कारखानदारांनीं कमी नफा घेतला पाहिजे, ऊंस पिकविणाऱ्यांनीं उसाची किंमत कमी घेतली पाहिजे, व साखर कारखान्यांतील मजुरांनीं बोनस सोडून दिले पाहिजे. त्याचप्रमाणें मध्य व राज्य सरकारांनीं अबकारी कर व ऊंसपट्टी ह्यांत कपात केली पाहिजे.

---

## नूनमति येथील तेलशुद्धीचा कारखाना

आसाममधील नूनमति येथें काढण्यांत येणारा तेलशुद्धीचा कारखाना १ जानेवारी, १९६२ पासून चालू करण्यांत येणार आहे. इंडिअन ऑईल रिफायनरीजचे अध्यक्ष श्री. बारुआ ह्यांनीं ही माहिती जाहीर केली आहे. कारखान्यासंबंधीं पत्रपरिषदेंत बोलतांना ते म्हणाले कीं, उत्पादनास प्रारंभ झाल्यावर पहिले कांहीं महिने कारखान्यांत त्याच्या उत्पादनक्षमतेच्या ५० टक्के येवढेंच उत्पादन करण्यांत येईल. कारखान्याची संपूर्ण उत्पादनक्षमता दरसाल ७·५ कोटी टनांची आहे. कारखान्याला लागणारें अशुद्ध तेल पुरविण्यासाठी नळाचा उपयोग करण्यांत येणार आहे. परंतु ही व्यवस्था पूर्ण होईपर्यंत रेल्वेमार्गानें अशुद्ध तेल आणावें लागेल. नळाचें काम पूर्ण होईपर्यंत वाट पाहाण्यांत येणार नाहीं. अशुद्ध तेलाचा सांठा करण्याचें काम ह्यापूर्वींच चालू झालें असून चालू वर्ष संपेपर्यंत ४५,००० टन अशुद्ध सांठा होईल असा अंदाज आहे. तेलाचें व तेलपदार्थांचें वांटप करण्यासाठी आसामचे तीन विभाग करण्यांत आले आहेत. आसाम ऑईल कंपनी आणि इंडिअन ऑईल रिफायनरीज ह्या कंपन्यांनीं वांटपाचे कामांत सहकार्य करावयाचें आहे. एका विभागांत इंडिअन ऑईल रिफायनरीजनें तयार केलेल्या मालाचेंच फक्त वांटप करण्यांत येईल. दुसऱ्या विभागांत वरील दोन्हीं कंपन्यांजवळ शिल्लक राहणारा जादा मालच फक्त विकला जाईल. नूनमति येथील कारखान्याचें उत्पादन यंत्रसामग्रींत कोणताहि फेरबदल न करतां १० टक्क्यांनीं वाढवितां येईल. बरौनी येथील तेलशुद्धीचा कारखाना १९६२ च्या अखेरीस चालू होईल.

---


टेलिफोन नं. २४८३. तार :

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|
| १ वर्ष | ... ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षे | ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,०८,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज-वसुली, पेन्शन, कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

## दि धुळें डिस्ट्रिक्ट सें. को. बँक लि.

सुरुवातीस बँक स्थापनेचे वेळीं बँकेचें विक्री झालेलें शेअर भांडवल फक्त ५,६४,७५० रु. होतें; गेल्या ३३ वर्षांच्या काळांत तें ३३,२१,८०० रु. झालें आहे. सभासदसंख्या ४६१ नें वाढून ती १२१८ झाली आहे. अहवालाचे वर्षी ठेवींत २५ लक्ष रु. ची भर पडून एकूण ठेवी १ कोटि, ५० लक्ष रु. वर गेल्या. ग्रामीण भागांत जास्तींत जास्त शाखा उघडून बँक जनतेशीं समरस होत आहे. राखीव व इतर निधि २ लक्ष, १९ हजार रु. चे आहेत. सोसायट्यांना २ कोटि, ११ लक्ष रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत. बँकेनें आदिवासी भागास विशेष मदत केली आहे. "बँकेची प्रगति कर्जाच्या वसुलीबाबत महाराष्ट्र राज्यांत निश्चित प्रथम श्रेणीची आहे." अहवालाचे वर्षी बँकेनें ६ नवीन शाखा उघडून एकूण कचेऱ्यांची संख्या २२ केली. निव्वळ नफा २,४५,६६० रु. झाला.

## पूर्व खानदेश सें. को. बँक लि.

अहवालाचे सालअखेर बँकेच्या एकूण ४२ शाखा झाल्या आहेत. वसूल भांडवल ४२,७७,४०० रु. असून गंगाजळींत ३६,०५,९६० रु. आहेत. ठेवींची रक्कम ४,०५,२०,४९५ रु. झाली आहे. बँकेचे इतिहासांत ठेवी मिळविण्यांत संचालकांनीं उच्चांक गांठला आहे. जिल्ह्यांतील निरनिराळ्या प्रकारच्या संस्थांकडून २,९७,१४,०३३ रु. कर्ज येणें आहे. हाच आंकडा गेल्या वर्षी २,६०,७३,२५७ रु. होता. जिल्ह्यांतील कांहीं भागांत टोळधाडीमुळें बरेंच नुकसान झालें, तरी वसूल समाधानकारक झाला. नफा ४,७७,७७२ रु. झाला. बँकेच्या सभासदांत १,२७६ व्यक्ती असून ३,१८४ संस्था आहेत आणि बँकेच्या ४२ ठिकाणीं शाखा आहेत.

## श्रीमहालक्ष्मी को. बँक लि.

बँकेच्या पटावर ३,६८६ सभासद असून त्यांचें भाग भांडवल १,६४,५०५ रु. आहे. गंगाजळी व इतर फंडसूची रक्कम १,८४,९१८ रु. आहे. ठेवी २४ लक्ष, ५३ हजार रु. वर गेल्या असून कर्जात १६ लक्ष, ६२ हजार रु. गुंतवलेले आहेत. खेळतें भांडवल ३० लक्ष रु. झालें आहे. निव्वळ नफा २०,६४५ रु. झाला. बँकेच्या शिवाजी उद्यमनगर शाखेचें कामकाज उत्कृष्ट रीतीनें चालू आहे. तेथील लहान-मोठ्या कारखानदारांना ७ लक्ष रु. चीं कर्जें दिलीं, त्यांत कांहींहि थकबाकी नाही.

## दी भुसावळ पीपल्स को. बँक लि.

बँकेस वर्षाचा निव्वळ नफा ४०,७२६ रु. झाला आहे; गेल्या वर्षी तो ३०,४८२ रु. होता. बँकेनें रिपोर्टाचे वर्षात कॅश क्रेडिट वजा जातां १५ लक्ष, ५६ हजार रु. चें कर्ज दिलेलें आहे. लोन्स, ओव्हरड्राफ्ट व कॅश क्रेडिट येणें १३ लक्ष, ४४ हजार रु. आहे. बँकेचें वसूल भांडवल १,८९,१०० रु. असून फंड ३ लक्ष, ८४ हजार रु. चे आहेत आणि ठेवींची रक्कम सुमारें ३५ लक्ष रु. आहे. तरतें भांडवल २६ लक्ष रुपयांवर असून त्याचें प्रमाण ठेवींच्या ७५.२६% पडतें. बँक मेडिकल मदतीच्या वस्तूंचें खातें चालवीत असून त्याचा फायदा ८४ सभासदांनीं घेतला. बँकेनें स्वस्त धान्याचीं दोन दुकानें चालवलीं.

## श्रीबलभीम को. बँक लि., कोल्हापूर

१,६७० सभासद, ५ लक्ष, ५० हजार रु. च्या ठेवी, २ लक्ष, ६७ हजार रु. चे रिझर्व्ह व इतर फंड, ६ लक्ष रु. ९४ हजार रु. येणें कर्ज, १२,१५६ रु. नफा, शेअर भांडवल १,२२,७१० रु. असे ह्या बँकेचे प्रमुख आंकडे आहेत. अहवालाचे सालीं बँकेनें २१ लक्ष, २३ हजार रु. चा व्यवहार केला. सभासदांच्या आर्थिक उन्नतीबरोबरच त्यांची सामाजिक उन्नति करण्याकडे, शैक्षणिक प्रगति करण्याकडे, त्यांचें आरोग्य सुधारण्याकडे, त्यांच्यांत व त्यांच्या मुलाबाळांत वाचनाची आवड वाढविण्याकडे, त्यांच्या अल्पस्वल्प गरजा भागविण्याकडे, बँकेनें प्रथमपासूनच ध्येयदृष्टि ठेवलेली आहे.

## दि अष्टें को. अर्बन बँक लि, अष्टें

अधिकृत शेअरभांडवलाची मर्यादा ५० हजार रु. वरून १ लक्ष रु. करून अवघी ३ वर्षे झाली. बँकेनें अहवालसालीं ४१,५७० रु. वसूल करून उद्दिष्ट पूर्ण केलें. फंडस् २०,१४५ रु. वर गेले आहेत. ठेवींची रक्कम सुमारें ३ लक्ष रु. आहे. बँकेनें ३ लक्ष, २५ हजार रु. चीं कर्जें दिलीं आहेत. निव्वळ नफा १०,४७६ रु. झाला. आजपर्यंतच्या गेल्या १४ वर्षात थकबाकी कांहीं अंशानें कां होईना, शिल्लक होती ती अहवालसालीं संपूर्णपणें नष्ट करण्यांत आली. बँकेनें १४ हजार रु. चे विमा-हप्ते वसूल करून पाठवले. बँकेनें इमारत बांधण्यासाठी खुली जागा विकत घेतली आहे.



### दि मुरगूड सहकारी बँक लि., मुरगूड

वरील बँकेस अहवालाचे वर्षी २१,८०५ रु. नफा झाला. ४,१००० रु. चे नवीन शेअर्स खपून सालअखेरीस १,२०,८५० रु. चें शेअर भांडवल झालें आहे. फंड्स १७,७५४ रु. नीं वाढून एकूण फंड्स १,०६,७१४ रु. चे झाले आहेत. एकूण ठेवी ३,५३,१६७ रु. च्या झाल्या आहेत. गेल्या सहा वर्षांत खेळतें भांडवल दुप्पट झालें आहे. बँकेनें श्रीशाहू मार्केट यार्डमध्यें २२,२०३ रु. खर्चून इमारत बांधली आहे.

### दि सातारा को. लँड मॉर्गेज बँक लि.

अहवाल सालांत कर्जदार शेअर भांडवलापैकी ज्यांचें कर्ज पूर्णपणें भागलें, अशा सभासदांना ४०,६१० रुपयांची रक्कम परत करूनहि शेअरभांडवलांत १,०८,३५१ रु. ची वाढ झाली आहे. गेल्या वर्षीपेक्षा अहवालसालीं ६१ अर्ज जास्त दाखल होऊन मागणी वाढली आहे. बँकेनें सांगली, फलटण, इसलामपूर, तासगांव आणि सातारा ह्या कचेऱ्यांमार्फत ३१२ अर्जदारांना ६,०२,००० रु. चें नवीन कर्ज दिलें. नव्या विहिरी, विहीर दुरुस्ती व इंजनांसाठी ७६९ तगाई अर्जदारांना १६,४३,४०० रु. चें कर्ज बँकेनें वाटलें. बँकेचा कर्जाचा व्यवहार खूप वाढला, तरी एकूण येणें कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण जेमतेम ३% पडतें; गेल्या वर्षी तें ४% होतें.

१९६०–६१ मध्यें बँकेस २३,४७७ रु. नफा झाला. बँकेचा रिपोर्ट तपशीलवार माहितीनें परिपूर्ण असून बँकेचा व्यवहार समजण्यास अत्यंत उपयोगी आहे. रौप्य-ज्युबिली समारंभ लवकरच श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. नवीन सहकारी कायदा अमलांत आला, म्हणजे लँड मार्गेज बँकेचें नांव बदलून ‘ जमीन सुधारणा बँक ’ असें ठेविलें जाईल.

### बार्शी सेंट्रल अर्बन को. बँक लि.

अहवालाचें वर्ष नफ्याच्या दृष्टीनें संस्मरणीय राहील. चालू सालचा नफा ( ३६,५२५ रु. ) हा बँकेस आजपर्यंत, गेल्या ५२ वर्षांत, झालेल्या नफ्यांत सर्वोच्च आहे, बँकेच्या स्वतःच्या भांडवलांत वाढ झाली आहे. कर्जव्यवहारांत भरपूर वाढ दिसून येते. मालतारण व्यवहाराला खूपच मागणी होती. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अहवालाचे वर्षी बँकेनें बार्शीतील टांगेवाले लोकांना अश्वरोगसाथीचे वेळीं कर्जरूपानें केलेलें आर्थिक साह्य. टांगा युनियनचे प्रयत्नानें वसुली नियमितपणें झाली.

### ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

१४ मार्च, १९५८ रोजीं नोंदण्यांत आलेली ही बँक स्वावलंबी होण्यास १९६३ पर्यंत वेळ लागेल, अशी अपेक्षा होती. पण, अहवालाचे वर्षी, २७ महिन्यांच्या कालावधींतच, बँकेस ४,३६४ रु. नफा झाला आहे. वर्षअखेर भागभांडवल ८,६०,१५० रु. असून ६० लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. ५० लक्ष रु. चीं कर्जे दिलेलीं आहेत. आतां जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांचे ठिकाणीं बँकेच्या शाखा झाल्या आहेत. इतर केंद्र स्थानींहि शाखा उघडण्याचा विचार आहे. ठाणें जिल्हा आर्थिक दृष्ट्या मागासलेला आणि सहकारी चळवळीच्या दृष्टीनें अविकसित असा आहे. ह्या दृष्टीनें बँकेचे संचालक कसून प्रयत्न करीत आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७११००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — ” ३॥ ”
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — ” ५ ”
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
[ टेलि. : २७०१४ सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ स्थापना : १९१८
लाख
शेअर भांडवल : ... ... रु. १०·००
वसूल भांडवल ... ... रु. ८·९१
रिझर्व्ह व इतर फंडस् : ... ... रु. १०·४०
ठेवी : ... ... रु. १५१·७२
खेळतें भांडवल : ... ... रु. १८०·८८
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवारी लेन, मुंबई ४.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ‘ दुर्गाधिवास ’ ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.